# समिती दर्पण

ऑगस्ट २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org

### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहेत. त्यात ७५० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# समितीची उद्दिष्टे साध्य होत असल्याचे सिद्ध

## निवास, भोजन, सुरक्षितता, उपक्रम उत्तम असल्याचा विद्यार्थ्यांचा अभिप्राय

**अशोक पाथरकर**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांकडून समितीमधील निवास, भोजन, सुरक्षितता, उपक्रम याविषयी त्यांची मते व सुधारणेसाठी अभिप्राय मागविला होता. यावर्षी गुगल फॉर्मद्वारे ऑनलाइन पद्धतीने अभिप्राय मागविले होते. त्यामुळे त्यांचे वर्गीकरण करणे सोपे झाले. हे गुगल फॉर्म तयार करण्यात राजलक्ष्मी मोटे या विद्यार्थिनीने मदत केली.

**एकूण ४२३ विद्यार्थी- विद्यार्थिनींनी फिडबॅक दिला आहे. त्यांच्या मतांचा सारांश पुढीलप्रमाणे,**

१ वसतिगृहाची मूळ उद्दिष्टे - राहण्याची सोय, भोजन, सुरक्षितता, वसतिगृहातील वातावरण व शिस्त या बाबतीत ९० ते ९५ टक्के विद्यार्थ्यांनी ‘उत्तम’ असे मत दिले आहे.

२ अभ्यासिका, ग्रंथालय, योगासने, आरोग्यकेंद्र या सोयी, ज्या इतर वसतिगृहांमध्ये नसतात, पण समितीत दिल्या जातात, त्यांनासुद्धा ८० ते ८५ टक्के विद्यार्थ्यांची पूर्ण पसंती आहे.

३ ज्या सोयींच्या बाबतीत ‘उत्तम’ म्हणणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे, त्यात मुख्यतः इंटरनेट (४७ टक्के), संगणक प्रशिक्षण व वापर (७७ टक्के), भाषा व इतर वर्ग (६३ टक्के), खेळ व ओपन जिम (६९ टक्के) आणि आर्थिक मदत (६१ टक्के) यांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त काही वैयक्तिक पातळीवरचे प्रश्नही विचारण्यात आले होते. त्याबद्दलही बहुतांश विद्यार्थ्यांचे अभिप्राय सकारात्मक आहेत. समितीबद्दलची माहिती त्यांना माजी विद्यार्थी, इंटरनेट किंवा मित्रांकडून मिळाली. समितीतील मित्रमैत्रिणी, विद्यार्थी विकास केंद्राचे उपक्रम, यामुळे घरच्या आठवणीमुळे येणारी बेचैनी कमी होते, असे अनेकांनी म्हटले आहे. विद्यार्थी विकास केंद्राचे कार्यक्रम, स्पर्धा, कमवा- शिका योजना, उद्योजकता विकास कार्यक्रम यामुळे आवडी, छंद जोपसता आल्याची नोंद केली आहे. झाडणे, पुसणे, स्वच्छता करणे आवडते, मात्र टॉयलेट, बेसीन धुणे, मेसमधील कामे याबद्दल थोडी नाराजी दर्शविली आहे.



### चार तास कामामुळे शिस्त, पण बदल हवा

चार तास काम योजनेमुळे शिस्त, वक्तशीरपणा, नियमितपणा, वेळेचे महत्त्व आणि नियोजन या बाबी शिकता आल्या. कोणतेही काम करताना लाज वाटणे बंद झाले, असा अभिप्राय नोंदवितानाच विद्यार्थ्यांनी या योजनेत काही बदलही सुचविले आहेत. कामात १ ते ३ महिन्यांनी बदल करावा, परीक्षेच्या काळात काम नसावे, झाडांना पाणी घालण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा, अशा काही सूचना आहेत.

स्थानिक पालकांविषयी सर्वांचाच अनुभव चांगला आहे. त्याविषयी कोणीही तक्रार केलेली नाही.

विद्यार्थी विकास केंद्राचे उत्कर्ष, उद्योजकता, फाउंडेशन कोर्स, गटचर्चा, यजुर्वेंद्र महाजन यांचा कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन, गणेशोत्सव, स्पर्धा, पथनाट्य हे उपक्रम आवडतात, कारण त्यातून कलागुणांना वाव मिळतो, उद्योजकीय मानसिकता तयार होते, आपत्ती काळात काय करावे, हे समजते, याशिवाय या उपक्रमांमुळे आत्मविश्वास वाढला, सभाधीटपणा आला, नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या, वेळेचे व्यवस्थापन करायला शिकलो, असा अभिप्राय विद्यार्थ्यांनी नोंदविला आहे.

कमवा- शिका योजनेत गवत कापणे, बागकाम, परीक्षांचे सुपरव्हिजन, पत्रके वाटणे, अशा कामांचा उल्लेख करून या योजनेच्या सक्तीमागचा समितीचा हेतू साध्य होत असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे.

जेवण पुरेसे असते, सर्व पदार्थ चांगले असतात, समितीतील जेवणामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढले, रोगप्रतिकारशक्ती वाढली, सकाळचे दूध आणि जेवण यातून ऊर्जा मिळते, असे विद्यार्थ्यांनी म्हटले आहे. मात्र त्याचबरोबर भोपळा, सिमला मिरची या भाज्यांची चव आवडत नाही, बटाट्याचे प्रमाण कमी करावे, असेही म्हटले आहे.

**निम्म्याहून अधिक मुलांनी कोणत्याही बदलाची आवश्यकता नाही, असे म्हटले आहे. उर्वरित मुलांनी केलेल्या काही सूचना...**

१. सकाळी लवकर जाणाऱ्यांची जेवणाची सोय करावी. २. वसतिगृह बंद करण्याची वेळ रात्री ९ असावी. ३. प्रत्येक विंगसाठी / खोलीसाठी स्वतंत्र इंटरनेट कनेक्शन द्यावे. इलेक्ट्रिक पॉइंट वाढवावेत. ४. काही महिन्यांत कार्यक्रम खूप असतात, ते कमी करावेत. ५. ग्रंथालयात फायनान्स या विषयावरील पुस्तके असावीत. ६. अभ्यासिकेत व आजूबाजूला शांतता असावी. ७. ग्रंथालयाची वेळ वाढवावी. तेथे आणखी पंखे बसवावेत. ८. विविध भाषांचे वर्ग ठेवावेत.

सध्या सुरू असलेल्या उपक्रमांव्यतिरिक्त भाषांचे वर्ग, इंग्रजी संभाषण, नृत्य, कराटे, अभिनय वर्ग, कारखान्यांना भेटी, यूपीएससी परीक्षांची तयारी असे उपक्रम राबवावेत, शनिवारी एखादा चित्रपट दाखवावा, अशा सूचना काही विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

खरे गरजू समितीत यावेत, यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी, उत्पन्न दाखल्याची काळजीपूर्वक तपासणी करावी, ऑनलाइन प्रचार वाढवावा, समक्ष घरी जाऊन परिस्थिती पाहावी, असे विद्यार्थ्यांनी सुचविले आहे.

पर्यवेक्षक भावाप्रमाणे किंवा आईप्रमाणे वाटतात, अशी भावना बहुतांश विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

### समितीशी नाते ठेवण्याची इच्छा

समितीतून बाहेर पडल्यावर पुढील शिक्षण घेणार, असे उत्तर २१४ जणांनी दिले आहे. १६६ जणांनी नोकरी किंवा इंटर्नशिप किंवा नोकरी करत शिक्षण असे नमूद केले आहे. स्वतःच्या पायावर उभे राहिल्यानंतर समितीला देणगी द्यायला आवडेल, गेस्ट म्हणून येऊन मुलांना मार्गदर्शन करायला आवडेल, कार्यकर्ता होईन, गरीब विद्यार्थ्यांची फी भरेन, अशी तयारी दर्शविली आहे. तर काहींनी पगारातील काही भाग समितीला देणार, असे म्हटले आहे.

# पथनाट्य, भारुड आणि ‘स्वरगंधर्व’च्या निर्मात्याशी संवाद



## समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त उत्साहात झेंडावंदन

समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. लजपत भवन येथे कार्यकर्त्या सीमा होस्कोटे, सुमित्रा सदन येथे संजय अमृते यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. डॉ. आपटे वसतिगृहात प्रसिद्ध अभिनेते, सूत्रसंचालक, स्वरगंधर्व चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक योगेश देशपांडे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यावेळी स्वरगंधर्व चित्रपटात आशा भोसले यांची भूमिका केलेल्या अभिनेत्री- गायिका अपूर्वा मोडक विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी योगेश देशपांडे, अपूर्वा मोडक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षण आणि संस्कार देऊन व्यक्तिमत्त्व घडविण्याचे काम करणारी ही संस्था खऱ्या अर्थाने युवा परिवर्तनाचे केंद्र आहे, असे गौरवोद्गार श्री. देशपांडे यांनी काढले. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून तिचे करिअरमध्ये रुपांतर करण्याचे काम येथे होते, असेही ते म्हणाले. अपूर्वा मोडक यांनी आपल्या जीवनातील प्रतिज्ञेचे महत्त्व सांगत ती

पान २ वर ▶

### कलाकार कट्टा येथे पथनाट्याचे सादरीकरण



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी उद्यान व फर्ग्युसन रस्त्यावरील कलाकार कट्टा येथे सायंकाळी पथनाट्य सादर केले. ‘स्क्रिन ॲडिक्शन’ या विषयावरील या प्रबोधनात्मक पथनाट्याला दोन्ही ठिकाणी प्रेक्षकांनी मोठा प्रतिसाद दिला. यावेळी विद्यार्थ्यांबरोबर पर्यवेक्षक मोनिका शिंदे, नम्रता गजरे, सचिन खांडेकर व विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार शिंदे आदी उपस्थित होते.

### नगरच्या वसतिगृहात ध्वजवंदन

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अहमदनगरमधील कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात स्वातंत्र्यदिनी पक्षीमित्र प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. या निमित्ताने विद्यार्थिनींनी वसतिगृहाचा परिसर रांगोळ्यांनी सुशोभित केला होता. यावेळी समितीचे कार्यकर्ते नंदकुमार देशपांडे, सुनीता झिंजाड, नवनाथ झिंजाड, रवींद्र देशपांडे, पर्यवेक्षिका विद्या सूर्यवंशी, नरेंद्र सूर्यवंशी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांच्या परिस्थितीचे मूल्यांकन

## भूमिका

समितीच्या वसतिगृहात विद्यार्थी - विद्यार्थिनींना प्रवेश देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रक्रियेची परिणामकारकता तपासून आवश्यक असल्यास त्यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने समितीच्या वसतिगृहात राहात असलेल्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. वसतिगृहात प्रवेश घेतलेले विद्यार्थी हे समितीच्या तत्वांशी सुसंगत आहेत की नाही, हे समजून घेणे, हाही त्यामागील एक उद्देश होता. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे मूल्यांकन करणे, किती विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती आहे, एकल पालक असलेले किंवा अनाथ विद्यार्थी किती आहेत, हे विद्यार्थी त्यांच्या घरात/ कुटुंबात उच्च शिक्षण घेणारी पहिली पिढी आहे का, हे जाणून घेणे हीही या सर्वेक्षणामागची भूमिका होती.

## सर्वेक्षणासाठी वापरलेली पद्धत

समितीच्या पाच वसतिगृहांमध्ये, सन २०२३ - २४ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व ७६९ विद्यार्थ्यांकडून त्यांची माहिती गुगल फॉर्मच्या माध्यमातून भरून घेतली. विश्वस्त रत्नाकर मते यांनी ही संकल्पना मांडून त्यासाठी मार्गदर्शन केले. काही स्वयंसेवक विद्यार्थ्यांना सर्वेक्षणाचा उद्देश आणि फॉर्म कसा भरायचा, हे समजावून सांगितले. प्रथम त्यांच्याकडून १० फॉर्म भरून घेण्यात आले. त्यानंतर आवश्यक बदल करून ते फॉर्म सर्व विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले. या प्रकल्पाचे सर्व काम विद्यार्थिनी राजलक्ष्मी मोटे हिने केले. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कार्यकर्त्या कविता हेबाळकर यांनी केले.

## सर्वेक्षणाचा कालावधी व सहभाग


ता. २५ डिसेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत हे सर्वेक्षण करण्यात आले. सर्व ७६९ विद्यार्थ्यांपैकी ७५२ (९९ टक्के) विद्यार्थ्यांनी गुगल फॉर्मच्या स्वरूपात माहिती दिली, त्यामध्ये ४२५ (५६.५ टक्के) मुले आणि ३२७ (४३.५ टक्के) मुली आहेत.

## मिळालेल्या माहितीचे विश्लेषण


- सर्वेक्षणात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ५४१ (७२ टक्के) विद्यार्थी १८ – २० वर्ष या वयोगटातील आहेत.
- एकूण विद्यार्थ्यांपैकी, ३९१ (५२ टक्के) विद्यार्थ्यांचे १० वी/ १२ वीपर्यंत शिक्षण सेमी इंग्रजी माध्यमातून, २४८ (३३ टक्के) विद्यार्थ्यांचे इंग्रजी माध्यमातून आणि ११३ (१५ टक्के) विद्यार्थ्यांचे मराठी माध्यमातून झालेले आहे
- ८८ (१२ टक्के) विद्यार्थ्यांना एकच पालक आहेत, तर १० विद्यार्थी अनाथ आहेत.
- एकूण ७५२ विद्यार्थ्यांपैकी ३२९ (४४ टक्के) पश्चिम महाराष्ट्र, २६ टक्के मराठवाडा, १९ टक्के उत्तर महाराष्ट्र आणि ७ टक्के विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतून आलेले आहेत.
- एकूण विद्यार्थ्यांपैकी सर्वात जास्त २४८ (३३ टक्के) पुणे जिल्ह्यातील तर ९० (१२ टक्के) अहमदनगर जिल्ह्यातील आहेत.

## जिल्हानिहाय विद्यार्थीसंख्या


- ५५३ (७४.५ टक्के) विद्यार्थी ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांमधून आलेले आहेत.
- १४७ (२० टक्के) विद्यार्थी असे आहेत ज्यांच्या घरापासून जवळच्या मोठ्या केंद्रापर्यंतचे अंतर २० किलोमीटरपेक्षा जास्त आहे.




## कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न




- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी एकत्रित वार्षिक उत्पन्न बघता, असे दिसून येते की, ६८८ (९१.५ टक्के) विद्यार्थी हे एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील आहेत, ज्यामध्ये ४०८ (५४.३ टक्के) विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न ५० हजारांपेक्षा कमी आहे. ५७ (७.६ टक्के) विद्यार्थ्यांच्या पालकांवर पाच लाखांपेक्षा अधिक आणि १४३ (१९ टक्के) पालकांवर दोन लाख ते पाच लाखांपर्यंत कर्ज आहे.
- कुटुंबातील शैक्षणिक स्थितीबाबत विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीवरून लक्षात येते की, ३६ टक्के (२७२) विद्यार्थ्यांच्या वडिलांनी आणि ४२ टक्के (३१६) विद्यार्थ्यांच्या आईने फक्त माध्यमिक (secondary) स्तरापर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. २५ टक्के (१९१) विद्यार्थ्यांच्या वडिलांनी आणि १४ टक्के (१०४) विद्यार्थ्यांच्या आईने उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे.
- एकूण ७५२ पैकी १७ (२ टक्के) विद्यार्थ्यांचे वडील आणि ४ (०.५३ टक्के) विद्यार्थ्यांची आई पदव्युत्तर (Post Graduate) आहे.
- विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमांशी त्याची तुलना केल्यावर असे लक्षात येते की बहुसंख्य विद्यार्थी हे उच्च माध्यमिक स्तराच्या पुढे जाऊन उच्च शिक्षण घेणारी कुटुंबातील पहिली पिढी आहे.
- ७५२ विद्यार्थ्यांपैकी, २४ टक्के विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांतील डिप्लोमा कोर्स निवडला आहे. २० टक्के विद्यार्थी अभियांत्रिकी शिक्षण घेत आहेत आणि त्यानंतर बी.एस्सी. (१८ टक्के), बी.कॉम. (१२ टक्के) आणि बी.ए. (८ टक्के) अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आहेत.
- एकूण १ टक्क्यापेक्षा कमी वाटा असलेले अभ्यासक्रम ‘इतर कोर्सेस (५ टक्के)’ अंतर्गत एकत्रित केले आहेत. ज्यामध्ये व्होकेशनल, आयटीआय, हॉटेल मॅनेजमेंट, एमएसडब्ल्यू, बीपीएमटी, बीएएमएस, व्हीएफएक्स, पत्रकारिता आदींचा समावेश आहे.




## पालकांचा व्यवसाय

कुटुंबातील सदस्यांचा व्यवसाय शेती आहे का आणि असेल तर जमिनीचा प्रकार कोणता, ह्या प्रश्नाच्या उत्तरावरून असे दिसून येते की ७२ टक्के (५४०) मुलांच्या कुटुंबाचा व्यवसाय शेतीशी निगडित आहे आणि नाही असे उत्तर देणाऱ्या २१२ मुलांच्या पालकांचा कौटुंबिक व्यवसाय, शेतमजुरी, किराणा/झेरॉक्स दुकान, खासगी नोकरी, मोलमजुरी, शिवणकाम, वाहन चालवणे, किंवा परंपरागत व्यवसाय आहे.

# पोलिस आणि जवानांशी जोडले बंधुत्वाचे नाते

पोलिस आणि लष्करी जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीतील विद्यार्थिनींनी त्यांना राखी बांधून त्यांच्याशी बंधुत्वाचे नाते जोडले. समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातर्फे आयोजित ‘धागा आपुलकीचा’ या उपक्रमांतर्गत १९ ऑगस्टला रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्या शिवाजीनगर पोलिस चौकीतील पोलिस बांधव आणि भगिनी, खडकीच्या आर्मी हॉस्पिटलमधील जवानांना बांधल्या. येरवडा मुक्त कारागृहातही हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी समितीचे माजी विद्यार्थी व कार्यकर्ते श्री. गणेश काळे यांचे सहकार्य लाभले. समितीच्या दहा विद्यार्थिनींनी शिवाजीनगर पोलिस चौकीतील पोलिस बांधवांना तसेच पोलिस भगिनींना राख्या बांधल्या. २० विद्यार्थिनींनी खडकी येथील आर्मी हॉस्पिटलला भेट दिली. तेथे ब्रिगेडियर ज्योती जोशी, लेफ्टनंट कर्नल सुभाष वाघ आणि



सैनिक बांधव- भगिनींच्या उपस्थितीत रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला. यावेळी तेथील पदाधिकाऱ्यांनी समितीला भेट देऊन मार्गदर्शन करण्याची तसेच औषधे पुरवण्याचीही इच्छा व्यक्त केली. त्याचप्रमाणे हा उपक्रम कायम चालू ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# बारामती दौऱ्यात अभ्यासले शेतीतील प्रयोग



कृत्रिम प्रज्ञेद्वारे (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) ऊसशेतीचे नियंत्रण, शेडनेटमध्ये मातीविना शेती असे शेतीतील अद्भूत प्रयोग पाहण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्यकर्त्यांना मिळाली. निमित्त होते बारामती अभ्यासदौऱ्याचे.

ता. ८ ऑगस्ट रोजी झालेल्या अभ्यासदौऱ्यात ३० कार्यकर्ते सहभागी झाले होते. बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी साकारलेल्या डेअरी फार्ममधील सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर जेनेटिक इम्प्रुव्हमेंट या केंद्राला भेट देऊन दूध उत्पादनाबद्दल माहिती घेतली. बारामती ॲग्रिकल्चर कॉलेजमधील अटल इनोव्हेशन सेंटर, इनक्युबेशन सेंटर पाहिले. कृषी विज्ञान केंद्राच्या भेटीत कृत्रिम प्रज्ञेद्वारे उसाचा प्लॉट कसा नियंत्रित केला आहे, याची माहिती घेतली. शेडनेटमधील मातीशिवाय फक्त पाण्यावर केलेली पालेभाज्यांची लागवड पाहिली. कृषी विज्ञान केंद्राची मुख्य इमारत पाहिली. कमलनयन बजाज इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधील विद्या प्रतिष्ठानच्या centre of excellence in digital manufacturing & Robotic Automation या केंद्राला भेट दिली. SimuSoft Simulating Success कंपनीचे सुनील चोरे (समितीचे माजी विद्यार्थी) यांनी या केंद्रासाठी परिश्रम घेतले आहेत. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात शरद पवार यांच्या जीवनावरील संग्रहालय पाहिले.

# उद्योजकतेविषयीच्या शंकाचे पोतनीस यांनी केले निरसन

डॉ. सी. ई. पोतनीस यांनी उद्योजकता विकास, व्यवसाय व्यवस्थापन, त्याची कौशल्ये आणि संधी याबद्दल उद्योजकता विकास केंद्राच्या सत्रात माहिती दिली. सत्र संवादात्मक झाल्याने विद्यार्थ्यांच्या अनेक शंकांचे निरसन झाले. श्री. पोतनीस यांनी यावेळी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या. जगाच्या सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली. व्यवसाय सुरू करण्यातील अडचणी सांगत असतानाच त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. आपले उद्दिष्ट आणि आनंद हे कोणतीही कामे करण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे असते, हे त्यांनी समजावून सांगितले.



# माजी विद्यार्थी मंडळातर्फे रक्षाबंधन

ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या मुलामुलींना सणाच्या दिवशी घरची आठवण येते. मात्र घरी जाणे शक्य नसते. त्यांचीही उणीव भरून काढून, त्यांना सणाचा आनंद देण्यासाठी माजी विद्यार्थी मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. मंडळाच्या सचिव मनीषा गोसावी, प्रार्थना सदावर्ते, अनिता देशपांडे- सावंत, विद्या लिमये, मृण्मयी लिमये आणि मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये झाला.



# पथनाट्य, भारुड आणि ‘स्वरगंधर्व’च्या निर्मात्याशी संवाद

▶ पान १ वरून
सर्वांकडून म्हणूनही घेतली.

यावेळी जीवन बोधले, विजय वाघ, सोहम देशमुख, प्रतीक मानकर, ओंकार फटांगरे, नेहा जोशी, अमिता सरपटे, खुशी सणांसे, साक्षी अंभोरे, नंदिनी खंदारे, दीक्षा पारवे या विद्यार्थ्यांच्या पथकाने ‘स्क्रिन ॲडिक्शन’ या विषयावर प्रबोधनात्मक पथनाट्य सादर केले. तर सिद्धी राऊत हिने भारुड सादर केले.

उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत साक्षी चव्हाण, हर्षल कोरडे, साक्षी सुर्वे यांना उद्योगासाठी आर्थिक मदत दिली होती. उद्योग यशस्वी झाल्यानंतर स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून त्यांनी ती रक्कम विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे यांच्याकडे परत केली.

कार्यक्रमाला कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, विश्वस्त तुकाराम गायकवाड, संजय अमृते, रत्नाकर मते, विनया ठोंबरे, मनोज गायकवाड, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी दुर्गेश पवार यांच्यासह कार्यकर्ते माजी विद्यार्थी, पर्यवेक्षक उपस्थित होते.